**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.38, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFERRED JOURNAL, NOV-DEC, 2019, VOL- 7/55*

# माध्यमिक स्तरावरील विद्यार्थिनींच्या संस्कृत लेखनातील व्याकरणाच्या चुका सुधारण्यासाठी उपक्रम राबवून त्यांच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**पुनम भिमराव वाघमारे, Ph. D.**
*सहाय्यक प्राध्यापिका, ॲड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नासिक*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रास्ताविक:**

'संस्कृतिः संस्कृताश्रिता' या संस्कृत उक्तीनुसार प्राचीन भारतीय संस्कृतीच्या अभ्यासासाठी आणि संस्कृतच्या अभ्यासासाठी संस्कृत भाषा ज्ञात असावी. चार हजार वर्शांपासून संस्कृत भाशेचे वर्चस्व भारतीय साहित्यावर दिसून येत. संस्कृत भाशेला थोर परंपरा आहे. महर्शी वाल्मीकी, महर्शी व्यास, महर्शी पाणिनी, महाकवी कालिदास, बाणभट्ट, भास, श्रीहर्श इत्यादी श्रेश्ठ महर्शिंनी व संस्कृत कवींनी संस्कृत भाशेला अध्यात्मिक व भाशिक सौंदर्याच्या शिखरावर नेवुन पोहचविले आहे. अशी ज्ञानसमृध्द भाशा समजण्यासाठी आणि त्यामध्ये असणा—या साहित्याचे रसग्रहण करता येण्यासाठी केवळ संस्कृतची तोंड ओळख असून चालत नाही तर त्यासाठी भाशेचा आत्मा म्हणजे व्याकरण सुद्धा येणे आवश्यक आहे. परंतू सर्वसामान्यांची धारणा अशी असते की व्याकरण हे क्लिश्ट आहे. पण शिक्षकांनी शेक्षणिक साहित्याद्वारा हसत खेळत विविध उपक्रम राबवून लेखनाचे नियम हे सुयोग्य नियोजनातून अध्यापन केल्यास माध्यमिक स्तरावरील विद्यार्थिनींना संस्कृत व्याकरण आकलनीय होईल आणि संस्कृत लेखनातील चुका दूर होतील.

**संशोधनाची गरज आणि महत्त्व** –

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना संस्कृत विशयाचे अध्यापन करीत असतांना विद्यार्थीनी संस्कृत व्याकरणात म्हणजेच लेखनात चुका करतात. विद्यार्थी मातृभाशा आणि इंग्रजी विशय इयत्ता पहिलीपासून अनिवार्य पद्धतीने शिकतात. परंतु संस्कृत विशय आठवीपासून शिकवला जातो आणि तोही ऐच्छिक स्वरुपाचा आहे. हा विशय काही शाळांमध्ये संपूर्ण तर काही शाळांमध्ये संयुक्त पध्दतीने शिकविला जातो. संस्कृत भाशा अध्यापनासाठी अन्य भाशेच्या तुलनेत कमी आहेत. त्यामुळे सराव कमी होतो आणि विशय कठीण वाटतो. त्याचाच परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये संस्कृत विशयाची गोडी निर्माण होत नाही. विविध उपक्रमांच्या माध्यमातून संस्कृत विशयाची गोडी वाढविता येईल. संस्कृत लेखनाच्या नियमांचा अभ्यास केल्यामुळे मातृभाशा स्वरुपात अभ्यासता येईल, वाचता तसेच लिहिता सुद्धा येईल.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संशोधनातील पारिभाशिक व्याख्या :–**

**संकल्पनात्मक व्याख्या :–**

1. माध्यमिक स्तर – या भााळेत इ.9 ते 10 वी या वर्गासाठी शिक्षण दिले जाते त्या वर्गाच्या स्तराला माध्यमिक स्तर असे म्हणतात.
2. संस्कुत – महाराश्ट्राज्य माध्यमिक शिक्षणमंडळाच्या अभ्यासक्रमात इ.8 वी पासून तृतीय भाशा म्हणून शिकविला जाणारा विशय म्हणजे संस्कृत होय.

**कार्यात्मक व्याख्या–**

1. माध्यमिक स्तर – सारडा कन्या विद्यालय या भााळेत इ. 9 वी च्या वर्गासाठी शिक्षण दिले जाते. त्या वर्गाच्या स्तराला माध्यमिक स्तर असे म्हणतात.
2. विदयार्थीनी – सारडा कन्या विदयालयातील इ. 9 वी चे संस्कृत विशयाचे अध्ययन कराणा–या मुली
3. संस्कृत – महाराश्ट्राज्याच्या शिक्षणमंडळाल्या अभ्यासक्रमातील इ. 9 वी मध्ये तृतीय भाशा म्हणून शिकविला जाणारा भाशा विशय.
4. लेखन – आपल्या मनातील विचार व्याकरण नियमांना अनुसरून लिपीबध्द केले जातात त्याला लेखन असे म्हटले म्हणतात.
5. उपक्रम – इ. 9 वी च्या संपूर्ण संस्कृत विशयाच्या लेखनात येणा–या समस्यांच्या निराकरणासाठी योजलेल्या विविध प्रकारच्या कृती म्हणजे उपक्रम होय.
6. परिणामकारकता – ऐखादया समस्यावर उपाय योजना करून त्यातून फलसिध्दी प्राप्त होते त्यास परिणामकारकता असे म्हणतात.

**संशोधनाचे उद्दिश्टये –**

1. माध्यमिक स्तरावरील विदयार्थीनींच्या संस्कृत लेखनातील व्याकरणाच्या चुकांचा शोध घेणे.
2. माध्यमिक स्तरावरील विदयार्थीनीच्या संस्कृत लेखनातील चूका सुधारण्यासाठी उपक्रम राबविणे.
3. माध्यमिक स्तरावरील विदयार्थीनींच्या संस्कृत व्याकरणातील चूका सुधारण्यासाठी राबविलेल्या उपक्रमांची परीणामकता अभ्यासणे.

**संशोधनाची परिकल्पना** –विदयार्थीनींच्या संस्कृत लेखनातील व्याकरणाच्या चुका सुधारण्यासाठी राबविलेल्या उपक्रमाच्या सार्थ परिणाम दिसून येतो.

**शुन्य परिकल्पना** – विदयार्थीनींच्या संस्कृत लेखनातील व्याकरणाच्या चुका सुधारण्यासाठी राबविलेल्या उपक्रमाच्या सार्थ परिणाम दिसून येत नाही.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संशोधनाची चले. –**

1. स्वाश्रयी चल – संस्कृत लेखन सुधारण्यासाठी राबविलेले उपक्रम

2. आश्रयोचल – संस्कृत लेखनातील सूधारणा

**संशोधन व्याप्ती, मर्यादा व परिमर्यादा –**

1.सदर संशोधन हे नासिक जिल्हातील मा.रा. सारडा कन्या विदयामंदीरातील विदयार्थीनीसाठीच व्याप्त आहे.

2.सदर संशोधन हे इ. 9 वी मधील संपूर्ण संस्कृत विशयाचे अध्ययन करणा–या विदयार्थीनी पूरतेच व्याप्त आहे.

3. प्रस्तुत संशोधन हे 2016–17 या शैक्षणिक वर्शासाठी आहे.

4. प्रस्तुत संशोधन हे संस्कृत विशयाच्या लेखनापूरताच मर्यादीत आहे.

5. प्रस्तुत संशोधन विदयार्थीनीनी दिलेल्या प्रतिसादावर अवंलून आहे.

6. प्रस्तुन संशोधन 40 विदयार्थीनी पूरतेच मर्यादीत आहे.

**संशोधन पध्दती**–प्रस्तुत संशोधनासाठी प्रायोगिक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला. संशोधन अधिकल्पापैकी एकल गट अभिकल्प वापरण्यात आला.

**संशोधनाची जनसंख्या व न्यादर्श**–प्रस्तुत संशोधनासाठी माध्यमिक स्तरावर संस्कृत विशय अध्ययन करणा–या मा.रा.सारडा कन्या विदयामंदीरातील इ. 9वी मधील़ तीन तुकडयातील एकूण 150 विदयार्थीनी म्हणजे प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या होय. प्रस्तुत संशोधनासाठी असंभाव्यतेवर अधारीत नमुना निवड पध्दतीतील सहेतूक नमुना निवड पध्दतीचा अवलंब करून 40 विदयार्थीनीची नमुना म्हणून निवड केली.

**सांखिकीय तंत्र**–

प्रस्तुत संशोधनासाठी मध्यमान, प्रमाण विचलन आणि टीमुल्याचा अवलंब करण्यात आला.

**पूर्वचाचणी आणि उत्तर चाचणीतील संख्याशास्त्रीय परिणाम**–

| अ. क्र | तपशील | विद्यार्थी संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | मध्यमान प्रमानत्रुटी | मध्यमानातील फरक | प्राप्त टी मूल्य | सार्थकता स्तर (0.01) | शून्य परिकल्पनेचा त्याग/स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पूर्वचाचणी | 40 | 7.34 | 1.996 | 0.31 | 0.4744 | 19.32 | सार्थक | त्याग |
| 2 | उत्तरचाचणी | 40 | 16.5 | 2.291 | 0.36 | | | | |

**संशोधनाचे निश्कर्श –**

1. संस्कृत विशयाचे अध्यापन करतांना संस्कृत लेखनातील चुका सुधारण्यासाठी विविध उपक्रम राबविले असता विद्यार्थीनींच्या अध्ययनात लक्षणीय फरक दिसून येतो.
2. संस्कृत लेखनातील आणि वाचनातील मूलभूत संकल्पना स्पश्ट झाल्या.
3. विविध स्पर्धांचा आणि पाठांतर योजनांचा योग्य परिणाम दिसून येतो.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

4. प्रत्यक्ष अध्यापन करतांना विद्यार्थीनी कमी अधिक प्रमाणात संस्कृतमधून संभाशण करण्यास पवृत्त होतात.
5. कृतीयुक्त विविध उपक्रमांमुळे संस्कृत व्याकरणाची भीती कमी होवून आत्मवि" वास वृध्दिंगत होण्यास मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ सूची –**

*आगलावे, प्रदीप **(**1.जाने.2000**)** : स"ोधन पद्धती शास्त्र व तंत्र., नागपूर, विद्या प्रकाशन.*

*भिंताडे, वि. रा.* ***(2005) : शैक्षणिक संशोधन पद्धती., पुणे, नूतन प्रकाशन***

***मुळे, रा.भा. आणि उमाठे वि.तु. (1987) : शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे. नागपूर, महाराश्ट ग्रंथ निर्मिती मंडळ.***

***जोशी, प्र.भा. (1993) : सुगम संस्कृत व्याकरण. पुणे, नितीन प्रकाशन.***

***खरे ज्योत्स्ना, कुलकर्णी मृणालिनी (2007) : सुलभ संस्कृत लेखन, पुणे, डायमंड पब्लिकशन्स.***

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*